लोकमत
औरंगाबाद, बुधवार, दि. १३ डिसेंबर २०१७

# जागतिक हवामान बदलावर उद्या मंथन

## चर्चासत्र : देश-विदेशातील शास्त्रज्ञ येणार

लोकमत न्यूज नेटवर्क

**औरंगाबाद :** हवामान बदल व त्याचे शेतीवर होणारे परिणाम यावर सातत्याने संशोधन करणारे देश व विदेशातील शास्त्रज्ञ शहरात येत आहेत. एवढेच नव्हे तर राज्यातील चारही कृषी विद्यापीठ पुन्हा एकदा एकत्रित येऊन विचारमंथन करणार आहेत. १४ ते १६ डिसेंबरदरम्यान होणाऱ्या या आंतरराष्ट्रीय चर्चासत्रातून निघालेले निष्कर्ष, उपाययोजना राज्य शासन, शास्त्रज्ञ, शेतकऱ्यांसाठी दिशादर्शक ठरणार आहे.

एमजीएम महाविद्यालयातील रुक्मिणी सभागृहात १४ रोजी हवामान बदलावरील आंतरराष्ट्रीय चर्चासत्राचे सकाळी १० वाजता उद्घाटन होणार आहे. या आंतरराष्ट्रीय चर्चासत्राचे गांभीर्य लक्षात यावे, यासाठी वाल्मी येथे परभणी येथील वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाचे कुलगुरू वेंकटेश्वरलू यांनी पत्रपरिषद घेतली. कुलगुरूंनी सांगितले की, बदलते हवामान व त्याचा कृषी क्षेत्रावर होणाऱ्या परिणामावर देश-विदेशात संशोधन सुरु आहे. या आंतरराष्ट्रीय चर्चासत्रात शास्त्रज्ञ संशोधन, नवतंत्रज्ञानाची माहिती देणार आहे. शिवाय भविष्यातील हवामानबदलाच्या आव्हानांना कसे सामोरे जायचे व कोणत्या परिस्थितीत



कोणते पीक शेतकऱ्याला तारू शकेल. याचा दिशादर्शक अहवाल या चर्चासत्रातील सखोल मंथनातून तयार करण्यात येणार आहे. याचा फायदा राज्य शासनाला त्यांचे शेतीविषयक धोरण ठरविण्यात मोठा उपयोग होईल, तसेच कृषी उद्योग तसेच शेतकऱ्यांनाही अहवाल अतिउपयुक्त ठरेल, असेही त्यांनी नमूद केले. चर्चासत्राचे उद्घाटन नीती आयोगाचे सदस्य डॉ. रमेश चंद करणार आहे. यावेळी अध्यक्षस्थानी पद्मभूषण डॉ. आर. एस. परोडा व चारही कृषी विद्यापीठाच्या कुलगुरूंची उपस्थिती राहणार आहे. वाल्मी येथे १२ सत्रात प्रत्येक विषयावर सखोल विचारमंथन होणार आहे. शास्त्रज्ञांसाठी प्रदर्शनही भरविण्यात येणार आहे.

या प्रदर्शनात शेतकऱ्यांसाठी एक चर्चासत्र आयोजित करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले. यावेळी वाल्मीचे महासंचालक एच. के. गोसावी आदींची उपस्थिती होती.